10 OCT 2023 'लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठात 'कन्झर्व्हिंग वाइल्ड लाइफ टूगेदर' या ग्रंथाचे प्रकाशन शनिवारी कुलगुरु डॉ. डी.टी शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, डॉ. माधव भिलावे, डॉ. सुनील कोळी, विश्वास देशपांडे उपस्थित होते.

# ...तर भावी पिढ्या नैराश्येत जातील

## डॉ. डी. टी. शिर्के : डॉ. भिलावे, डॉ. कोळी यांच्या ग्रंथाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मानवाने वेळीच आपल्या हव्यासाला आळा घातला नाही, तर पुढच्या पिढ्या नैराश्याच्या खाईत लोटल्या जातील, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी शनिवारी व्यक्त केले.

विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. माधव भिलावे आणि डॉ. सुनील कोळी यांनी संपादित केलेल्या 'कन्झर्व्हिंग वाइल्ड लाइफ टूगेदर' या ग्रंथाचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आपण सारे काही नष्ट करीत चाललो आहोत, हे आधी मान्य करूया आणि मग त्या वाचविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करूया. ही आजघडीची मोठी गरज आहे. डॉ. भिलावे यांनी या पुस्तकाद्वारे वन्यजीवांना वाचविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांचा ऊहापोह केलेला आहे.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, आपल्या स्वार्थापायी जैवविविधता नष्ट करत चाललो आहोत, हे थांबविले पाहिजे. वन्यजीव विपरित वागत आहेत, याची कारणे मानवाने आपल्या वर्तनामध्ये शोधणे आवश्यक आहे.

प्रकाशक विश्वास देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. राहुल तायडे यांनी आभार मानले.

लोकमत

# विद्यापीठात उद्यापासून राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी अध्यासन केंद्र, दत्ता देशमुख अध्यासन व अमरावती येथील शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्यावतीने उद्या, बुधवारपासून डॉ. पंजाबराव देशमुख : व्यक्ती विचार व कार्य या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले आहे. उद्या सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र सभागृहात या चर्चासत्राचे उद्‌घाटन शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. ज्येष्ठ लेखक राजन गवस यांचे बीजभाषण होणार आहे. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल.

पुढारी

# विद्यापीठात उद्यापासून दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग, गांधी अध्यासन केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्यासन, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती, श्री शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ ऑक्टोबर रोजी 'डॉ. पंजाबराव देशमुख: व्यक्ती, विचार आणि कार्य' विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाचे उद्घाटन श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. बीजभाषण ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस करतील. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. डॉ. रवींद्र भणगे, प्रा. डॉ. प्रकाश पवार, डॉ. रामेश्वर भिसे यांनी केले आहे.

10 OCT 2023 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हव्यासाला आळा न घातल्यास भावी पिढ्या नैराश्यात

## कुलगुरू डॉ. शिर्के : 'कन्झर्व्हिंग वाईल्ड लाईफ टुगेदर' ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवाने वेळीच आपल्या हव्यासाला आळा घातला नाही, तर पुढच्या पिढ्या नैराश्याच्या खाईत लोटल्या जातील, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. माधव भिलावे आणि डॉ. सुनील कोळी यांनी संपादित केलेल्या 'कन्झर्व्हिंग वाईल्ड लाईफ टुगेदर' या ग्रंथाचे वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, निसर्गाच्या प्रत्येक बाबतीमध्ये मानवाने सातत्याने हस्तक्षेप केला आहे. पाणी, जमीन आदी पर्यावरणीय घटक वाचवण्याबरोबरच अगदी प्राणी, वनस्पती वाचवण्यासाठीही जागृती करण्याची वेळ आली आहे. डॉ. भिलावे यांनी या पुस्तकाद्वारे वन्यजीवांना वाचवण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांचा ऊहापोह केला आहे.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, आपण स्वार्थापायी जैवविविधता नष्ट करत चाललो आहोत, हे थांबवले पाहिजे.

प्रकाशक विश्वास देशपांडे यांनी २१० पृष्ठांच्या ग्रंथामध्ये एकूण २५ लेख असून, ते विविध सहा विद्यापीठांमधील एकूण ४६ तज्ज्ञ लेखक, संशोधकांनी लिहिले आहेत, असे सांगितले. यावेळी डॉ. भिलावे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. राहुल तायडे यांनी आभार मानले. यावेळी ग्रंथाचे अनेक सहलेखकही कार्यक्रमास उपस्थित होते.

10 OCT 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जागतिक शास्त्रज्ञांत विद्यापीठाचे १३ प्राध्यापक

## संशोधन कार्याची दखल : स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीकडून यादी जाहीर

▸सकाळ वृत्तसेवा

> स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने जाहीर केलेल्या जगातील आघाडीच्या दोन टक्के शास्त्रज्ञ संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापकांनी स्थान मिळविल्याचे समाधान आहे. त्याने विद्यापीठाचे संशोधन आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहे.
> **- डॉ. प्रमोद पाटील**, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर, ता. ९ : जगातील आघाडीच्या दोन टक्के शास्त्रज्ञ संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठातील १३ प्राध्यापकांनी स्थान मिळविले आहे. त्यातील १० जणांना सलग दुसऱ्यावर्षी पुनर्मूल्यांकन मिळाले आहे. त्यात प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचा समावेश आहे. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने यावर्षीच्या संशोधकांची यादी गुरुवारी (ता. ५) जाहीर केली.

'स्टॅनफोर्ड'ने जगभरातील प्राध्यापकांच्या संशोधन कार्याची दखल घेवून करिअर आणि एक वर्षातील कामगिरीवर आधारित दोन स्वतंत्र यादीमध्ये संशोधकांची नावे जाहीर केली आहेत. प्राध्यापकांचे संशोधन, शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधनपत्रिकेचा दर्जा, सायटेशन्स, आदी निकषांचा यादी जाहीर करताना विचार करण्यात आला. 'करिअर' यादीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पाटील, प्रा. केशव राजपुरे, ए. व्ही. राव, सी. एच. भोसले (भौतिकशास्त्र), जे. पी. जाधव, एस. पी, गोविंदवार (बायोकेमिस्ट्री) यांचा, तर एक वर्षातील कामगिरीच्या यादीत प्रा. पाटील, गोविंदवार, जाधव, राजपुरे (भौतिकशास्त्र) यांच्यासह प्रा. अण्णासाहेब मोहोळकर (भौतिकशास्त्र), के. एम. गरडकर, डॉ. तुकाराम डोंगळे, हेमराज एम. यादव, एस. ए. जाधव (नॅनोसायन्स), एस. व्ही. ओतारी (वायसी कॉलेज, कराड), शरद व्हनाळकर (कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी) यांचा समावेश आहे. या दोन्ही यादींमधील प्रा. पाटील, राजपुरे, राव, गोविंदवार, जाधव, यादव, मोहोळकर, ओतारी, गरडकर, डोंगळे यांनी सलग दुसऱ्यावर्षी क्रमवारीत पुनर्मूल्यांकन मिळविले आहे.

10 OCT 2025 तरुण भारत जनसंपर्क कक्ष. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बेटी बचाओ अभियान जनचळवळ होण्यासाठी कुराडे यांचे योगदान

## पुस्तक प्रकाशन सोहळ्यात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रा. किसनराव कुराडे–पाटील लिखित चिंगीचा माईंडसेट, भ्रूणकन्येचा आत्मध्वनी, चिंगीची भरारी, बिटिया का जीवनदान पत्र, आई... दार उघड.... आदी पुस्तकांच्या माध्यमातून 'बेटी बचाओ अभियाना' साठी योगदान दिले आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून ही लोकचळवळ केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देश पातळीवर पोहोचेल, असे मत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.

स्वयंभू यशवंतराव घाटगे संस्थानिक शाहू महाराज झाले नसते, तर...!!, गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार काळ आणि कर्तृत्व, आत्मदर्शन, शिक्षणशार्दूल व्ही. टी. पाटील काळ आणि कर्तृत्व, जीवनदान यज्ञ आदी पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग, शिवराज विद्या संकुल व वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सभागृहात प्रकाशन सोहळा झाला. याप्रसंगी ते बोलत होते.



शिवाजी विद्यापीठात प्रा. किसनराव कुराडे लिखित दहा पुस्तकांचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शोभा पवार, प्रा. किसनराव कुराडे , प्राचार्य. कदम, डॉ. प्रतिभा बी. देसाई, युवराज कदम.

डॉ. शिर्के म्हणाले, महिलांसाठी विद्यापीठाने लोकस्मृती वसतीगृह योजना अंमलात आणण्याकरिता वैशिष्ट्यपूर्ण योजना आखली आहे. प्रा. किसनराव कुराडे हे कमवा व शिका योजनेतून घडलेले माजी विद्यार्थी आहेत. त्यांच्यावर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या विचारांचा प्रभाव आहे.

प्रा. किसनराव कुराडे, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी केले. आभार युवराज कदम यांनी मानले. सुत्रसंचालन उज्वला पाटील यांनी केले.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, प्रा. जी. पी. माळी, हसन देसाई, सिध्दार्थ लाटकर, श्याम कुरळे, डॉ. प्रा. सुनील देसाई, अॅड. दिग्विजय कुराडे, बसवराज आजरी, एम. डी. देसाई, ईश्वर देसाई, मोहन कवटेकर, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. ज्योती जाधव आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# जगातील शास्त्रज्ञ संशोधकांत शिवाजी विद्यापीठाचे १३ प्राध्यापक

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून अभिनंदन : शिक्षण क्षेत्रातून स्वागत

**कोल्हापूर :** जगातील आघाडीच्या दोन टक्के शास्त्रज्ञ संशोधकांच्या यादीमध्ये शिवाजी विद्यापीठातील १३ प्राध्यापकांनी स्थान मिळविले आहे. स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने यावर्षीच्या संशोधकांची यादी जाहीर केली. 'स्टॅनफोर्ड' ने जगभरातील प्राध्यापकांच्या संशोधन कार्याची दखल घेवून करिअर आणि एक वर्षातील कामगिरीवर आधारित दोन स्वतंत्र यादीमध्ये संशोधकांची नावे जाहीर केली आहेत.

प्राध्यापकांचे संशोधन, शोधनिबंधांची संख्या आणि दर्जा, संशोधनपत्रिकेचा दर्जा, सायटेशन्स आदी निकषांचा यादी जाहीर करताना विचार करण्यात आला. 'करिअर' यादीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. केशव राजपुरे, डॉ. ए. व्ही. राव, डॉ. सी. एच. भोसले (भौतिकशास्त्र), डॉ. जे. पी. जाधव, डॉ. एस. पी. गोविंदवार (बायोकेमिस्ट्री) यांचा, तर एक वर्षातील कामगिरीच्या यादीत प्रा. पाटील, गोविंदवार, जाधव, राजपुरे (भौतिकशास्त्र) यांच्यासह प्रा. अण्णासाहेब मोहोळकर (भौतिकशास्त्र), डॉ. के. एम. गरडकर, डॉ. तुकाराम डोंगळे, डॉ. हेमराज यादव, डॉ. एस. ए. जाधव (नॅनोसायन्स), डॉ. एस. व्ही. ओतारी (वायसी कॉलेज, कराड), डॉ. शरद व्हनाळकर (कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी) यांचा समावेश आहे.

**विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा**

जगातील आघाडीच्या दोन टक्के शास्त्रज्ञ संशोधकांमधे शिवाजी विद्यापीठाच्या १३ प्राध्यापकांनी आपले स्थान कायम केले आहे. जागतिक पातळीवर सर्व संशोधकांनी शिवाजी विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले आहे. ही अभिमानाची गोष्ट आहे. विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. या क्रमवारीत विद्यापीठातील जास्तीत जास्त संशोधकांनी स्थान मिळवावे ही सदिच्छा.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के
(शिवाजी विद्यापीठ)

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात उद्या राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग, गांधी अध्यासन केंद्र, कॉ. दत्ता देशमुख अध्यासन आणि अमरावती येथील शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय चर्चासत्राचे उद्या (दि. ११) सकाळी ११ वाजता उद्‌घाटन करण्यात येणार आहे. अमरावती येथील शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख प्रमुख पाहुणे आहेत. तर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषवणार आहेत. हे चर्चासत्र विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात होणार आहे. 'डॉ. पंजाबराव देशमुख : व्यक्ती विचार आणि कार्य' हा चर्चासत्राचा विषय आहे. बीजभाषण ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे होणार आहे. १२ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता चर्चासत्राचा समारोप होणार आहे. तरी जास्तीत जास्त प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.